ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १११ वे | दिनांक : १६/०४/२०२६ | वार : गुरुवार

## जपानी मेंदूज्वराविरोधात महाराष्ट्र सतर्क



**मुंबई :** जपानी मेंदूज्वरासारख्या संसर्गजन्य आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, लसीकरण आणि जनजागृती यावर विशेष भर दिला जात आहे. जपानी मेंदूज्वर आजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्य शासन सतर्क असून लसीकरण मोहिमेला वेग देण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे. सार्वजनिक आरोग्य यंत्रणांनी समन्वयाने काम करून या आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे. २०१५-१६ दरम्यान देशातील इतर राज्यांत जपानी मेंदूज्वरावरील लसीकरण मोहीम सुरू झाली होती. याच दरम्यान विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये जपानी मेंदूज्वराचे रुग्ण आढळले. मात्र, महाराष्ट्रात त्याची सुरुवात झाली नव्हती. ही बाब तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आली. त्यांनी त्यावेळी केंद्र सरकाराला विशेष विनंती केली आणि जपानी मेंदूज्वर आजारांवरील लसीकरण मोहीमेला राज्यात सुरुवात केली. या प्रयत्नांमुळे आज रुग्णसंख्या जवळपास शून्यावर आली आहे.

महाराष्ट्रात जपानी मेंदूज्वर या आजाराबाबत आरोग्य यंत्रणा सतर्क झाली असून लसीकरण व नियंत्रण उपाययोजनांना गती देण्यात आली आहे. हा आजार प्रामुख्याने डासांद्वारे पसरतो आणि मेंदूवर परिणाम करून गंभीर गुंतागुंत, झटके तसेच मृत्यू होण्याची शक्यता निर्माण करतो. या आजाराचा मृत्यूदर जास्त असून वाचलेल्या रुग्णांमध्ये न्यूरोलॉजिकल समस्या उद्भवू शकतात.

राज्यात २०२१ ते मार्च २०२६ या कालावधीत रुग्णसंख्या तुलनेने कमी असली तरी काही जिल्ह्यांमध्ये काही प्रकरणे आढळली आहेत. २०२२ मध्ये २ रुग्ण, २०२३ मध्ये ५ रुग्ण, २०२४ मध्ये ५ रुग्ण व २ मृत्यू, २०२५ मध्ये ७ रुग्ण व १ मृत्यू नोंदविण्यात आले, तर २०२६ च्या मार्चपर्यंत एकही रुग्ण आढळलेला नाही. नागपूर, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या विदर्भातील जिल्ह्यांमध्ये प्रामुख्याने रुग्ण आढळले आहेत.

एप्रिल २०२५ ते फेब्रुवारी २०२६ दरम्यान लसीकरण मोहिमेत राज्याने लक्षणीय प्रगती केली आहे. पहिल्या डोसचे एकूण कव्हरेज ८९.२६ टक्के तर दुसऱ्या डोसचे ७८.६८ टक्के आहे. धाराशिव (९९.५९ टक्के), लातूर (९७.८४ टक्के) आणि सोलापूर (९५ टक्के पेक्षा जास्त) जिल्ह्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. मात्र रायगड ५५ टक्के पहिला डोस व ४८ टक्के दुसरा डोस, पुणे आणि पीसीएमसी भागात दुसऱ्या डोसचे प्रमाण तुलनेने कमी असल्याचे दिसून आले आहे.

राज्यात जपानी मेंदूज्वराच्या निदानासाठी नागपूर, गडचिरोली, सेवाग्राम (वर्धा), भंडारा आणि गोंदिया येथे पाच सेंटीनेल केंद्रे कार्यरत आहेत. तसेच १६ जिल्ह्यांमध्ये बाल अतिदक्षता विभाग (PICU) सुरू असून रुग्णांना आवश्यक उपचार सुविधा उपलब्ध आहेत.

आरोग्य विभागाच्या माहितीनुसार विदर्भ हा जपानी मेंदूज्वरासाठी सर्वाधिक संवेदनशील भाग आहे. ग्रामीण व कृषी क्षेत्रात डासांची वाढ, तसेच डुक्कर व पक्ष्यांच्या संपर्कामुळे संसर्गाचा धोका अधिक असतो. काही शहरी व उपनगरी भागातही साथीचा धोका संभवतो.

राज्यात नियमित लसीकरण, विशेष मोहिमा, रक्त नमुना तपासणी, डास नियंत्रणासाठी धूरफवारणी, क्यूलेक्स डासांचे सर्वेक्षण, जनजागृती, डासांच्या उत्पत्तीस्थळांवर गप्पी मासे सोडणे तसेच स्वच्छता मोहिमा राबविण्यात येत आहेत.

जपानी मेंदूज्वर हा आजार विशेषतः लहान मुलांसाठी धोकादायक असल्याने नागरिकांनी लसीकरण करून घ्यावे, डासांपासून संरक्षण करावे आणि ताप किंवा मेंदूशी संबंधित लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

## खरातने सांगितले मित्र जिवंतय, पण दुसऱ्याच दिवशी मृतदेह सापडला

**नाशिक :** सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी भोंदू अशोक खरात प्रकरणात नाव जाहीर केल्यानंतर माजी आमदार शिवाजी सहाणे यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना खरातची भविष्यवाणी कशी फोल ठरली, याचा खुलासा केला आहे. आपला एक मित्र बेपत्ता असताना त्याच्या शोधासाठी आपण खरातशी संपर्क साधला होता. त्यावेळी खरातने तो मित्र सुखरूप असल्याचे सांगितले होते, मात्र दुर्दैवाने दुसऱ्याच दिवशी त्या मित्राचा मृतदेह सापडला, असे सहाणे यांनी नमूद केले. अंजली दमानिया यांनी आजच्या पत्रकार परिषदेत त्यांचे नाव घेतले होते. यावर आपण केवळ मित्राच्या चिंतेपोटी त्याच्याशी संपर्क आल्याचा दावा सहाणे यांनी केला आहे.

शिवाजी सहाणे यांनी सांगितले की, ८-१० वर्षांपूर्वी माझा खरातसोबत परिचय झाला होता. तो नेमका कोणाच्या माध्यमातून झाला होता ते मला आठवत नाही, परंतु त्यातील काही ठळक गोष्टी आहेत, ज्यावेळी मी त्याचीशी संपर्क केला. त्यातील दोन दुर्दैवी घटना आहेत. एक चार वर्षांपूर्वी माझा एक मित्र घरातून निघून गेला होता, आणि तो सापडत नसल्याने आम्ही सर्व मित्रांनी पोलिस स्टेशनला तक्रार दिली होती. तरी तो सापडेल असे काही वाटेना म्हणून, काही मित्रांनी असे सूचवले की, अशोक खरातला आपण विचारून बघू त्याला भविष्य कळते. पुढे शिवाजी सहाणे यांनी सांगितले की, त्यानंतर मग मी माझ्याच फोनवरून त्याचीशी संपर्क साधला होता. त्याने मला सांगितले की आमदार साहेब तुमचा मित्र सुखरूप आहे आणि तो दोन दिवसांनी परत येईल. पण त्यानंतर दोनच दिवसांनी मला माझ्या मित्राचा मृतदेह गोदावरी नदीत सापडला. तेव्हा आमच्या सर्व मित्रांचा खरातवरून विश्वास उडाला.

## माणसे बदलल्याने पक्ष मजबूत होणार नाही





**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटात पक्षांतर्गत फेरबदलांच्या हालचाली सुरू असून, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या खांद्यावर लवकरच 'कार्याध्यक्ष' पदाची धुरा सोपवण्यात येणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. मात्र, या संभाव्य नेतृत्व बदलावर भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी जोरदार टीका केली आहे. "केवळ माणसं बदलून पक्ष वाढत नसतो, तुम्ही विचारांना मुठमाती दिली म्हणूनच तुमच्यावर ही 'मरणअवकळा' आली आहे," अशा बोचऱ्या शब्दांत दानवे यांनी आदित्य ठाकरेंना लक्ष्य केले.

गत काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात वेगवान घडामोडी घडत आहेत. त्यातच जून महिन्यात होणाऱ्या ठाकरे गटाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत उद्धव ठाकरे यांचे सुपुत्र आदित्य ठाकरे यांच्या खांद्यावर मोठी जबाबदारी टाकली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी राज्याच्या राजकारणात संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या पार्श्वभूमीवर रावसाहेब दानवे यांनी प्रतिक्रिया देत शिवसेना ठाकरे गटावर टीका केली आहे3

आदित्य ठाकरे यांनी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये केलेल्या कामाची दखल घेत त्यांना मोठी जबाबदारी दिली जाणार असल्याचे बोलले जात आहे. यावर प्रतिक्रिया देताना रावसाहेब दानवे म्हणाले की, "पक्षात माणसं बदलून काहीही साध्य होणार नाही. बाळासाहेब ठाकरे होते तेव्हाचा पक्ष आणि उद्धव ठाकरे आल्यानंतरचा पक्ष यात मोठी तफावत आहे. तुम्ही मूळ विचारांना सोडून दिले आहे. विचार बदलला की संघटनेची काय अवस्था होते, हे सध्या महाराष्ट्रात दिसत आहे."

रावसाहेब दानवे यांनी केवळ वैयक्तिक टीका न करता ठाकरे गटाच्या निवडणूक कामगिरीवरही बोट ठेवले. ते म्हणाले, "माणसे बदलल्याने पक्ष संघटना मजबूत होत नसते. जर तुमची संघटना इतकीच भक्कम आहे, तर तुमच्या किती नगरपालिका, महानगरपालिका आणि जिल्हा परिषदा निवडून आल्या? याचे उत्तर आधी द्यायला हवे. माणसे तुमच्यासोबत टिकली पाहिजेत, पण तुम्ही विचारच बदलल्याने ही परिस्थिती ओढवली आहे."

गेल्या काही महिन्यांपासून आदित्य ठाकरे हे पक्ष संघटनेत अधिक सक्रिय झाले आहेत. निवडणुकीचे नियोजन, दौरे आणि तरुण मतदारांना साद घालण्यात त्यांचा मोठा वाटा असल्याचे पक्षातील नेत्यांचे मत आहे. त्यामुळे त्यांना पक्षात अधिकृतपणे 'दुसऱ्या क्रमांकाचे' स्थान म्हणजेच कार्याध्यक्षपद देऊन संघटनात्मक ताकद वाढवण्याचा प्रयत्न ठाकरे गटाकडून सुरू असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, या सर्व चर्चांच्या पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरे यांनी बुधवारी दुपारी एका पोस्टद्वारे आपली कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यासंबंधी पक्षात कोणतीही चर्चा सुरू नसल्याचे ठणकावून सांगितले. आज सकाळपासून काही टीव्ही चॅनेल्सवर बातमी आहे की, मला पक्षात काही पद दिले जाणार आहे. ह्या बातमीत काहीही तथ्य नाही आणि अशी कुठलीही चर्चा पक्षात नाही. कृपया ह्याची सर्व माध्यमांनी नोंद घ्यावी, असे आदित्य ठाकरे प्रस्तुत बातमी फेटाळताना म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १६ एप्रिल २०२६


## शब्बीर अन्सारी यांनी मुस्लिम ओबीसींना संविधानाची शक्ती दाखवून विकासाच्या प्रवाहात आणले - मिर्झा अब्दुल कयुम नदवी



**छत्रपती संभाजीनगर :** मुस्लिम, ओबीसी मागास जाती , भटके विमुक्त यांना शिक्षण, संविधान , आरक्षणाचे हक्क, अधिकार यांची जाणीव व जनजागृती करून संविधानाची शक्ती दाखवून विकासाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य शब्बीर अन्सारी यांनीच केले आहे.- असे प्रतिपादन रिड एन्ड लिड फाउंडेशनचे अध्यक्ष मिर्झा अब्दुल कयुम नदवी यांनी केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात शब्बीर अन्सारी व डॉ.जनार्दन वाघमारे यांना आदरांजली वाहतांना गल्ली पासून दिल्लीपर्यंत समस्त मागास ओबीसी बांधवांना संघटित करत तब्बल सत्तावन्न शासन आदेश काढून ओबीसी व मागास मुस्लिमांना संवैधानिक अधिकार प्राप्त करून दिले , नामांतर लढ्यात नेते जोगेंद्र कवाडे, रामदास आठवले यांनाही सहकार्य करत आंदोलनात सहभाग नोंदवण्याचे नदवी म्हणाले.यावेळी डॉ. अशोक केवटे यांनी डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या लेखन कार्यातून उपेक्षित, वंचित घटकांना न्याय देत भगवान बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक व सांस्कृतिक विचारांचा वारसा कसा आला ते त्यांच्या सहवासातील विविध आठवणी व अनुभवातून स्पष्ट केला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आर व्ही मस्के हे होते , कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा नवनाथ गोरे यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ.रामेश्वर वर्शिल यांनी व आभार उपप्राचार्य प्रा.एन.एम करडे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास डॉ. प्रज्ञा रूईकर साळवे, डॉ.एस.पी.बुधवंत, डॉ.प्रेमराज वाघमारे, डॉ.संजय खरात, डॉ.गौतम घाडगे , डॉ. सुनील सोनवणे यांच्यासह प्राध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नागद घाटातील रस्त्याच्या दुरुस्तीला वनविभागाचा हिरवा कंदील



**कन्नड (अरुण थोरात):** खान्देश- मराठवाडा विभागांना जोडणाऱ्या कन्नड–गौताळा मार्गे नागद या रस्त्याच्या रुंदीकरण साठी वनविभागाची परवानगी मिळाल्याने परिसरातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे. दोन प्रादेशिक विभागाना जोडणारा हा मार्ग असून दररोज हजारो वाहने या मार्गाने जातात. रस्त्याची अतिशय बिकट झाल्याने अपघातांचे प्रमाण वाढले होते. शिवाय हा रस्ता घनदाट अभयारण्यातून जात असल्याने वाहनधारकांना जीव मुठीत धरुण जावे लागत होते. रस्त्याच्या रुंदीकरणा साठी आवश्यक असलेली वनविभागाची परवानगी मिळाल्याने, राज्य महामार्ग क्र. ३९ वरील औट्रम घाट परिसरातील या रस्ता दुरुस्तीच्या कामाला अखेर मार्ग मोकळा झाला आहे. वनविभागाकडून या प्रस्तावाला मजुरी देण्यात आल्याने दोन वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न निकाली निघाला आहे. या कामासाठी कन्नड च्या आमदार संजनाताई जाधव यांनी सातत्याने पाठपुरावा करून संबंधित विभागांशी समन्वय साधला. सबंधित रस्ता औट्रम घाटातून जात असल्यामुळे दुरुस्तीसाठी लवकरात लवकर, वनविभागाची परवानगी आवश्यक होती. १९८० मध्ये या रस्त्याचे डांबरीकरण झाले होते. त्यानंतर रस्त्याच्या रुंदीमध्ये कोणतेही बदल झाले नाही. त्याचाच संदर्भ देत १९८० पूर्वीच्या निर्णयानुसार वनविभागाने रस्त्याच्या डांबरीकरणाला हिरवा कंदील दिला असून लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. या निर्णयामुळे परिसरातील वाहतूक सुलभ होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## कर्ज

कर्जाभवती गुरफटत जातं ,
आलं ते वर्ष मागच्यासारखं सरत जातं..
दरवर्षी पुन्हा तसंच होतं...

ज्या वर्षी उत्पन्न चांगलं होतं ,
कामगाराला काम चांगल मिळतं
त्याच वर्षी नेमकं
निसर्ग कोपतो,
मंदी येते,
युद्ध होतं,
महामारी येते...

आयुष्याचं गणित बिघडून जातं,
कर्माच्या नावाखाली
स्वाभिमान बेदम चोपला जातो...

कष्टाने कमवलेल्या मालाला
फुकटभाव विकावं लागतं..
पगारवाढ थाप मारत ,
निमित्ताचं कारण देतं,
कामकारांना फक्त नि फक्त
सहानुभूती देते...

पेट्रोलपासून ते किराणा मालापर्यंत
सगळ्यांचे भाव आकाशाला भिडणार
शेतकऱ्याच्या मालाला
अन् कामगाराच्या कामाला
कवडीमोल भाव मिळणार...

असाच नियतीचा फेरा
गळ्यात गुंतून जातो
दरवर्षीच जुनंच रडगाणं
नेहमीसारखं गडु पाडून जातं.
मागे तकतक लागून,
दरवर्षीच नववर्ष
गडु भरण्यात निघून जातं..

दरवर्षी वाटतं
कर्ज सारं फेडून
या वर्षी निल होऊन जाऊ
एकदाच या कर्जातून मुक्त होऊन जाऊ..

वर्ष भामट पळून जातं
जिम्मेदारी एकट्यावर टाकून जातं...
कर्जाभवती गुरफटत जाऊन
आलं ते वर्ष मागच्यासारखं सरत जातं...

पुन्हा नव्या वर्षी,
मागचं कर्ज नव जुन करायला
काढावं मगं नवं कर्ज
हातपाय जोडत घ्यावं
एखादं छोट-मोठं कर्ज
एखादं क्रेडिट कार्ड,
हातउसणवारी फेडायला ...

असं करत करत
कर्ज वाढत जातं...
दरवर्षी पुन्हा...
कर्ज नव्याने
कर्जाभवतीच फिरत राहतं...

दरवर्षी वाटतं
कर्ज सारं फेडून
या वर्षी निल होऊन जाऊ
एकदाच या कर्जातून मुक्त होऊन जाऊ...

वर्ष भामट पळून जातं
जिम्मेदारी एकट्यावर टाकून जातं..
कर्जाभवती गुरफटत जाऊन
आलं ते वर्ष मागच्यासारखं सरत जातं..
दरवर्षी तेच कर्ज
तण वाढल्यागत वाढत जातं...

**- लक्ष्मण वाल्डे ,कन्नड**
**मो. - ८८८८६०६०६८**

## एम.पी.एस.सी द्वारे सरकारी अन् खासगी नोकर भरती



**मुंबई :** राज्य सरकारने राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा अधिक पारदर्शक व गतिमान करण्यासाठी निपुण सेतु उपक्रम राबवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या उपक्रमांतर्गत उमेदवारांनी एकदा एमपीएससी परीक्षा दिल्यानंतर त्यांना पुन्हा नोकरीसाठी परीक्षा देण्याची काहीही गरज नाही. ज्या उमेदवारांची अंतिम निवड झाली नाही, त्यांची निवड वेगळ्या संवर्गासाठी वेटिंग लिस्टच्या आधारावर केली जाणार आहे. विशेषतः या उमेदवारांची प्रतिक्षा यादी खासगी संस्थांनाही पाठवली जाणार असल्यामुळे या तरुणांसाठी कॉर्पोरेट वर्ल्डची कवाडेही खुली होणार आहेत. राज्यातील असंख्य तरुण केंद्रीय लोकसेवा आयोगी (यूपीएससी) व राज्य लोकसेवा आयोग (एमपीएससी) मार्फत शासकीय सेवेत जाण्याचा प्रयत्न करत आहेत. एका प्रयत्नात यश मिळाले नाही, तर ते हताश न होता पुन्हा ही परीक्षा देऊन आपले नशीब आजमावून पाहतात. त्यातच दरवर्षी विविध संवर्गासाठी शेकडो जागा निघत असल्यामुळे या परीक्षेसाठी तरुण जिवाचे रान करताना दिसून येतात. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य मंत्रिमंडळाने मंगळवारी झालेल्या बैठकीत एमपीएससी संदर्भात उपरोक्त निर्णय घेतला आहे.

सरकारने यूपीएससीच्या प्रतिभा सेतूच्या धर्तीवर एमपीएससीसाठी निपुण सेतु पोर्ट सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. भाजप आदार विक्रमसिंह पाचपुते यांनी यासंदर्भात मागणी केली होती. त्यांच्या मागणीची दखल घेत सामान्य प्रशासन विभागाने निपुण सेतू पोर्टल सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, आता एमपीएससीत अंतिम निवड न झालेल्या उमेदवारांची यादी सार्वजनिक व खासगी संस्थांना पाठवण्यात येईल. त्यामुळे उमेदवारांना खासगी व सार्वजनिक संस्थांतही नोकरीची संधी मिळू शकते. महाजॉब्स पोर्टल अंतर्गत निपुण सेतू उपक्रम सुरू केला जाईल. आतापर्यंत MPSC मार्फत केवळ ५३ संवर्गासाठी परीक्षा घेतली जात होती. आता नव्या निर्णयानुसार या संवर्गात वाढ करण्यात आली आहे. आता १०० संवर्ग निर्माण करण्यात आलेत. म्हणजे उमेदवाराने एका विभागातील नोकरीसाठी परीक्षा दिली, पण त्याची निवड झाली नाही आणि दुसऱ्या विभागात समकक्ष पद रिक्त असेल, तर त्याची त्या पदावर पुन्हा परीक्षा न देता निवड केली जाईल. या निर्णयामुळे प्रशासकसीय कामकाज गतिमान होईल व रिक्त पदे भरण्याची प्रक्रियाही अधिक वेगाने पूर्ण करता येईल. कर्मचारी निवड आयोगाने (एसएससी) परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी उत्तरतालिका व आक्षेप नोंदवण्याच्या नियमांमध्ये महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. वाढत्या तक्रारींवर नियंत्रण ठेवणे हा उद्देश आहे. गेल्या वर्षी तब्बल ५५ हजार तक्रारी आल्याच्या पार्श्वभूमीवर हे नवे नियम लागू करण्यात आले आहेत. यामुळे येणाऱ्या परीक्षांत विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. कर्मचारी निवड आयोगाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांमध्ये आता वादग्रस्त प्रश्नांबाबत 'सब्जेक्ट मॅटर एक्स्पर्ट्स' (एसएमईएस) यांचा निर्णय अंतिम मानला जाणार आहे. यापूर्वी प्रश्नपत्रिकेचा दर्जा, व्हेंडरच्या अनियमितता, नॉर्मलायझेशन प्रक्रिया आदी कारणांमुळे मोठ्या प्रमाणावर उमेदवारांनी तक्रारी केल्या होत्या. काही प्रकरणे न्यायालयातही होती. त्यामुळे उत्तरतालिकेसंदर्भात येणाऱ्या आक्षेपांवर हे नवे नियम करण्यात आले आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १६ एप्रिल २०२६


## युक्ती

जंगलातील एक झाड
होते ओबड धोबड
त्यावर राहायचे
एक मोठे घुबड

अंधाऱ्या रात्री
घुबड ओरडायचे
बिळातले उंदीरमामा
भितीने घाबरायचे

घुबडाचे ओरडने
वाढतच गेले
बिचाऱ्या उंदीरमामाचे
काहीच ना चाले

एकदा उंदीरमामाला
युक्ती सुचली
फटाक्याची माळ
चोरुण आणली

रात्रीला उंदीरमामाने
पेटविली वात
दडून बसला
बिळाच्या आत

फाड् फाड् आवाजाने
घुबड पळून गेले
तेव्हाच कुठे उंदीरमामाला
गाली हसू आले




**- रवींद्र व्ही. चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
जि.यवतमाळ
मो.9011559106


## प्रा. राकेश खैरनार यांना क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल 'राष्ट्रीय गौरव पुरस्कार २०२६' प्रदान




**छत्रपती संभाजीनगर :** देवगिरी महाविद्यालयातील क्रीडा विभाग प्रमुख प्रा. राकेश अभिमन खैरनार यांना आनंदी युनिव्हर्स फाउंडेशन तर्फे क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या भरीव आणि उल्लेखनीय कार्याबद्दल नाशिक येथे झालेल्या समारंभात राष्ट्रीय गौरव पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला*प्रा. राकेश खैरनार यांनी विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाप्रेम वाढवणे, त्यांना योग्य मार्गदर्शन देणे आणि विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी घडवून आणणे या क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या अथक परिश्रमांमुळे अनेक विद्यार्थ्यांनी जिल्हा, राज्य तसेच राष्ट्रीय अंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले आहे.त्यांच्या या यशस्वी कार्याची दखल घेत हा मानाचा पुरस्कार देण्यात आला असून, हा सन्मान त्यांच्या कार्याचा गौरवच नव्हे तर इतरांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103


## सन्मानाने जगू लागले

झोपडीतही प्रकाश पडला बाबा तुझ्यामुळे
झोपडीतला साहेब झाला भीमा तुझ्यामुळे

सन्मानाने जगू लागले तळागाळातले सारे
गाडी बंगला बांधून झाले भीमा तुझ्यामुळे

माणसासारखे जगू लागलो केवळ तुझ्यामुळे
स्वाभिमानाने जागृत झालो भीमा तुझ्यामुळे

शिक्षणाची गंगा आली बहुजनाच्या घरोघरी
बहुजन सारे जागे झाले भीमा तुझ्यामुळे

आनंद आले माझ्या दारी भीमा तुझ्यामुळे
पोरं आमची शिकू लागली भीमा तुझ्यामुळे

सुख समृद्धी दारात आली केवळ तुझ्यामुळे
जीवनातले कष्ट सरले सारे भीमा तुझ्यामुळे

हाल अपेष्टा सारेच संपले तुझ्या विचारामुळे
शिकून सवरून साहेब झालो भीमा तुझ्यामुळे
मान सन्मान सारेच मिळाले बाबा तुझ्यामुळे
जीवन माझे बदलून गेले भीमा तुझ्यामुळे

सारे काही बदलून गेले इथे बाबा तुझ्याचमुळे
अंधारात होतो प्रकाशात आलो भीमा तुझ्यामुळे




**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


## जिंतूरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भव्य मिरवणुका व शरबत वाटपाचा उपक्रम



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त शहरातून, सार्वजनिक जयंती उत्सव समितीसह शहरातील वेगवेगळ्या प्रभागातून भव्य मिरवणूका काढण्यात आल्या. या वेळी सामाजिक दायित्व जपत छ.शिवाजी महाराज चौक येथे समाजसेवकांनी थंडगार रसना शरबत वाटप करण्यात आले. डॉ बाबासाहेब आंबेडकर समितीचे अध्यक्ष गुणीरत्न वाकोडे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्या वेळी व्यंकटेश भुरे, सय्यद इमरान,पत्रकार सचिन रायपत्रीवार, रामपूरकर ,बालाजी सोमाणी, स्वराज मगर, फयुम पठाण, मकसूद जमादार, अलीम, आदी उपस्थित होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## निपाणी: महाविद्यालयातील रोजगार मेळाव्यात पंचवीस तरुणांना संधी



**कन्नड (अरुण थोरात) :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी रोजगाराची सुवर्णसंधी निर्माण करत जिजामाता महाविद्यालय निपाणी ता.कन्नड येथील २५ विद्यार्थ्यांना धूत ट्रान्समिशन लिमिटेड, एमआयडीसी शेंद्रा यांच्या वतीने जॉब कॅम्पस सिलेक्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या दरम्यान २५ जनांची निवड करण्यात आली आहे. या उपक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या कॅम्पसमध्ये ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांना त्यांच्या पात्रतेनुसार विविध पदांसाठी संधी उपलब्ध करून देण्यात आली. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा, मुलाखत तसेच कौशल्य चाचणी घेतली व त्यांच्या पात्रतेनुसार त्यांना तात्काळ नियुक्तीपत्र देण्यात आले. व नोकरीवर लगेच रुजू होण्यास प्राधान्य देण्यात आले. यामुळे परिसरात आनंदाचे वातावरण महाविद्यालयाच्या प्रती निर्माण झालेले दिसून आले.कार्यक्रमादरम्यान संस्थेचे अध्यक्ष जी.एस.पवार, प्रा.गोंगे, प्रा. अजमेरा, प्रा चव्हाण, प्रा.मोरे, प्रा.भवर, प्रा.पवार, प्रा.सोमवंशी, प्रा.काटे प्रा.सोनवणे, प्रा.पवार मॅडम, श्री आटोळे, श्री बोरसे व प्राचार्य, शिक्षकवर्ग तसेच स्थानिक मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असल्याचे सांगितले.या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड करण्यात आली असून, त्यांना पुढील प्रक्रियेसाठी मार्गदर्शन देण्यात आले. 'ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या गावाजवळच रोजगार मिळाल्याने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला असून, भविष्यातही अशा कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन व्हावे, आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या महाविद्यालयामार्फत रोजगाराची सुवर्णसंधी उपलब्ध व्हावी' अशी अपेक्षा धुत कंपनीचे मॅनेजर प्रदीप रासवे, यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १६ एप्रिल २०२६

# शिरगुळा - एक मनस्वी सृजनशील अक्षय आठवणीची रांगोळी




मराठवाड्यातील जेष्ठ साहित्यिक माजलगाव स्थित. शासनाचे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त प्रभाकर साळेगावकर सरांचे एक मनस्वी ललितलेखन 'शिरगुळा'हा मुरमाड खडकात अतिशय शिंगुळ्याने निर्माण झालेला आहे.गारगोटी जशा मुरमाड खडक वाळूत सापडतात. अगदी तसचं शिरगुळा सापडला की,त्याचा बारीक पिठकळ चुरा करून रांगोळी घातल्या जायची.तोच हा शिरगुळा बाईच्या नाजूक बोटातून नक्षीवंत रांगोळीचं थेंबभर चांदणं अंगणभर प्रतिबिंब होऊन उमटवायचं.या अतिशय सृजन सुचक प्रतिमा म्हणजे कवी प्रभाकर साळेगावकर यांचे हे ललितलेखन.प्रत्येक वाचकांच्या मनावर त्यांच्या बालपणीच्या स्मृतीची आठवण सांगताहेत.तीच त्यांच्या सृजनशीलतेची जगण्याची अदम्य इच्छा आहे.शिरगुळा व रांगोळी थांबली नाही.लेखक वाचकांच्या मनाच्या अंगणात एक आठवांची रांगोळी रेखतो आहे.सण,समारंभ,मंगलकार्य, राष्ट्रीय सण उत्सव आजही आधुनिक काळात हे थांबलं नाही.संदर्भ बदले तरी बाईचं,माईचं गोंदण कायमच आहे.हाच आठवणीचा बारीक कशिदा नितळ शुभ्र ललित लेखनात आला आहे.ज्या मायभूमीत लेखकांचे भरणपोषण झाले त्या गाव शिवाराचं व मनस्वी श्रध्देय भावनेचा अनुबंध म्हणजे हा शिरगुळा ललितलेखन.मलपृष्ठावर जेष्ठ साहित्यिक भारत सासणे पाठराखण अतिशय आशय संपन्नतेने लिहितात "मराठवाड्यातील दुर्गम प्रदेशानी आपल्याला 'गोमटी'मराठी दिली, आणि लुप्त होऊ पाहणारी जीवनपद्धती जपली.या चाली रीतीय परंपरा भाषा आणि त्याचे अर्थ इत्यांदीचे स्मरण प्रभाकर साळेगावकर यांनी त्यांच्या आठवणी वजा ललितलेखन मधून करून दिल्या असल्यामुळे समाजशास्त्रीय दृष्ट्या या लेखांचे मूल्य उच्चतम आहे.भाषीक मूल्य तर आहेच शिवाय लेखक आपल्या बालपणीच्या आठवणी काव्यात्म भाषेत आणि अल्प अक्षरात गतकाळातील हृदय रांगोळी रसिकां समोर मांडली आहे (मलपृष्ठ मजकूर)गोदातटीची गोमटी मराठी हे मनस्वी आहे.मराठवाड्याची रांगडीबोलीशैली हा तर हेल आहेच.या ललितलेखनात मायमातीचा अनुबंध काव्यमय केल्याने हे संपुर्ण ललितलेख मनाचा ठाव तर घेतातच पण गहिवरल्या भावनेचा ओलावा दिसून येतो.गावखेड्यातीलही जिव्हाळ्याची माणूस मनात नितळ निर्लेप निस्पृह श्रद्धेय भावनेतून येतात जसं हरिभाऊ होळकर मामा,यांचे आभाळभर मायाळू मनाचे लेखकांनी उत्तम व्यक्तीत्व मांडले आहे.तत्कालीन 'स्वरसंगम मेळा' ही एक गणपती उत्सवात अतिशय मनस्वी हृदयांकित अशी मेजवानी होती.ऑरकेष्ट्रा त्यातील गायकांची साधना त्यांचे स्वर हे एक मनाचे सांगेतिक भरणपोषण होते.हा अप्रतिम ललित अनुबंध आहे.डीळीला,खुंटीला रात्रभर मिनमीनता प्रकाश देणारा घराच्या भिंतीचा आणि घरातल्या माणसांच्या मनाचा अंधार दुर करणारा खुट कंदिल.माणसं माणसाचं कधीच दुस्वास करीत नव्हती कारण माणुसकीची माणगंगा म्हणजे 'भरोसा' हा आत्मविश्वास इमाने इतबारे घेऊन जगणारी गावं खेड्यातील माणसं.लेखकांचे बालपणीच्या गाव शेत शिवारात ही उर्जा केंद्र होती.मग शिवार ओढ म्हणू 'तांबडीचं तास' हा ललित अनुबंध मनस्वी आहे.'चक्का' बालपणीची खेळणं जे अस्सल कलेतून तयार झालेलं होतं उदा.कट,गजाळी,सायकलचे चक्का घनगड ,बैलगाडीच्या चाक,अशा अनेकविध्द टाकावू पासून टिकावू पण गावगाड्याच्या,शेतशिवार पायवाटेने खेळत जाणे हा विषय आशय संपन्न झाला आहे.चुरमा,निळं निळं फुलं,'माझी वही वेगळी' ही एक संस्कार शिदोरी मायाळू बटवा होऊन जाते आपण प्रेरक होऊन जातो याची मनस्वी गोष्ट.यात सुविचार,म्हणी व वळणदार अक्षर वाचनीय मजकूर ही मनाला उभारी देणारी शालेय स्मृती.'डोबी' ही पर्यावरण विषयक सण व मानवी वृत्ती-प्रवृत्तीचे सुखाच्या परमोच्च आनंदणारी गोष्ट आहे.सण समारोहत माणूस बेहद खुश असतो म्हणून कष्टवंताला थोडी विश्रांती मिळावी म्हणून 'डोबी.'तर गावं खेड्यात मनोरंजनाचं साधन म्हणून फिरती टॉकिज. गावकुसाला तंबू टाकून सिनेमा येयाचे.संत ज्ञानेश्वर,सखु आली पंढरपूरा,ते थापड्या,सोंगाड्या सारखी पिक्चर गाव खेड्यातील माय मावल्यांनी पाहावे.हा शुद्ध हेतू होता.इथे मात्र दोन मित्रांची तळतळाटीची गोष्ट आहे.टुरिंग टॉकिज मध्ये अनील व बंडू जातात.सवान जाग्यावर वरतोंड करून पडद्यावर पाहयेचं.लोकांच्या उंचीमुळे पुढचं दिसत नसे.तवा वाळूचा गंज करून बैठक मारायची पण काही कृमी,कुचित माणूस हाटकुन या पोरांची वाळूची खुर्ची पायाने खचून टाकायचे.असं हा बालभारती नितळ मनाचा अनुभव मनस्वीपण देऊन जातो.हे ललितलेखन म्हणजे शालेय व महाविद्यालयीन जीवनात जे मनाचे भरणपोषण झाले यांचा साक्षात अनुबंध देते.सन 1968ते 1970चा हा मराठवाड्याचा दुष्काळाचा काळ यात ही जगण्याच्या शिक्षणाच्या धडपडीतून घरात संस्काराचे अधिष्ठान असल्याने तत्कालीन सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक गुणसंपन्नता लेखकांनी मिळविली आणि गावं शिवार माय माती व आत्मिक माणसांचा वसा आणि वारसा या ललितलेखनाचा आरसा आहे.आजही गावरान करडीचं गोडतेल मनात रुंजी घालते.तेलाच्या घान्यातून काढलेलं पण त्यात पाल पडलेलं तेल खाल्यामुळे बंडूला घेऊन काळजीत पडलेले लेखक आणि त्यांची आई.हा माणुसकीचा गहिवर मनाला ओथंबून आणतो हे या ललितलेखनाचे वैशिष्ट्ये आहे.शाळा ही जीवन जगण्याची प्रेरणा आहे जो या शालेय जीवनात ज्ञान साधक होऊन कृतीउक्तीने व संघर्षरत राहिला तो यशस्वी झाला.म्हणूनप्रत्येक शाळा ही प्रेमळ प्रेरणा असते.मुक्या भिंती बोलतात.तर'वादळ आल्याची गोष्ट ही एक नैसर्गिक आप्ती आहे.पण ज्या गावात लेखकाचे बालपण गेले ते दिवस मनाला अस्वस्थ करतात.वादळ म्हणजे उध्वस्त जीवनाची नांदीच असते.वादळ वादळं असते ते रखुंदळ करुनच जाते.'झाडं'मात्र सारेच उन्हाळे पावसाळे अंगाखांद्यावर खेळवत दु:खाला मुठमाती देते.इथल्या पिंपळ पारावर एका गार सावलीला बाललीला करीत या झाडाच्या खोडाला लगडून बालपण गेले ती ओंजळभर सुखाचा आनंद देणारी गोष्ट.तर जांभळं वढा येथील वर्णन अतिशय सुरेख झाले आहे.जांभळांचा सडा पडावा अन् जिभेला चळक्कन पाणी सुटावं,तिथला निसर्गाचं मनाला भुरळ घालणारं वर्णन वाचकाभिमुख आहे."बाप कळायला उशीर झाला" हाॅस्पिटल मध्ये शेवटच्या घटका मोजणार बाप,हा ललितबंध मानाचे हळवे कप्पे उलगडून दाखवतो हेच खरे यश या ललितलेखनाचे आहे.प्रसंग साक्षेपी मनाची हळुवार वेदना मुखर करणारी आहे ती अशी "बाबा तुमची अखेरची इच्छा काय आहे हे! विचारणारा लेखक.आत्मा बालक होऊन देहाच्या मृत कुडीतून अवकाश मार्गस्थ होतो.तेव्हा तो फक्त बालक म्हणून गोड हसून निघून जातो.हे या ललितबंधाचे सृजनशील सुक्त आहे.बापाच्या व्यक्तीमत्वावर लिहिलेली कविता मनाला गहिवरून टाकते.हे या ललितबंधाचे श्रेयस आहे.कवीचा जीवाभावाचा संवगडी गेल्यावर एक हळव्या मनाचा कांगोरा कवी उलगडून दाखवला आहे.हे मनाच्या कल्लोळाचे ललितलेखन आहे.जसे'झाड'साहित्यिक भरणपोषण होतांना शालेय जीवनात आपल्या गुरू जनांची कृतज्ञता व्यक्त करताना मायेचा कढ दाटून येतात.दिवस पाखरांच्या पंखाने उडून जातात गुरूची पाठराखण शब्दांकित असते.असे संतविवेकी साधकांचे ऋण लेखकानी व्यक्त केले आहे.पुढे सातत्याने धडपडत उपक्रमशीलतेने मनाचा आईना ठळक आईनेदार होता गेला.कारण लेखकांने 'हा छंद जीवाला लावी पिसे'या गीतातून मनाचं सोज्वळ नितळ निर्लेप निस्पृह श्रद्धेय भावनेतून काव्य गायन लेखन मनाचा विरंगुळा होता गेला आणि एक नवल धवल रंगी 'शिरगुळा'या ललितलेखनाचा आरसा मिळाला.कारण पुढे शिक्षक ते मुख्याध्यापक हे प्रशासकीय पद पण एकच ध्यास तो म्हणजे"प्रार्थना,साधना,व साध्य' विद्यार्थी दैवत, त्यांच्या हिताची सौख्याची प्रार्थना,सतत कार्यरत ज्ञान साधना.हे घडवित असतांना दैवताला साध्य मिळवून देणे.अशी साक्षेपी निर्लेप साधना कवी प्रभाकर साळेगावकर सरांनी अखंड केली आहे.'मागे वळून पाहताना' या ललित लेखात आपण काय मिळवले तर दोन शब्दस्नेहाळ पुस्तकांची पानं आणि मानुकीची मनं.म्हणून हा आठवांचा 'शिरगुळा' जेव्हा मनामनावर सप्तरंगी इंद्रधनुष्यी रांगोळी रेखतो.मनस्वी हार्दिक शुभेच्छा.हे ललितलेखन अप्रतिम वाचनीय झाले आहे.वाचकांनी आवर्जून वाचावे ही सविनय विनंती. शिरगुळा:-ललितलेखन लेखक:-कवी प्रभाकर साळेगावकर,प्रकाशक:-आसावरी प्रकाशन,बीड मुखपृष्ठ:-विष्णू थोरे रेखाटने:-सारंग वाघमारे प्रथमावृती:-२४ डिसेंबर २०२५किंमत:-१५०/रूपयेपुस्तक परिचय.



- डॉ प्रभाकर शेळके, जालना

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १६ एप्रिल २०२६


# शासनाच्या भरती प्रक्रियेत सुधारणा, संयुक्त परिक्षा योजनेमध्ये १८ सेवांचा आणि ९३ संवर्गांचा नव्याने सामावेश


श्री. भगवंत परबतराव पाळवदे

शासनाच्या विविध पदांवरील भरती प्रक्रिया सुटसुटीत, सक्षम आणि उमेदवारांच्या दृष्टीने सुलभ व्हावी, याकरिता पदभरती प्रक्रियेत सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी देवेंद्र फडणवीस होते. या सुधारणेमुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या विविध सेवांतर्गत संवर्गांची संख्या १०२ होणार आहे. तर संयुक्त परीक्षा योजनेमध्ये नव्याने १८ सेवांचा आणि ९३ संवर्गाचा समावेश होणार. तसेच केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर राज्यात निपुण सेतू पोर्टल सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. विकसित महाराष्ट्र २०४७ च्या व्हिजन डॉक्युमेंटनुसार हा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. शासनाचे प्रशासन अनेक संवर्गांमध्ये विभागलेले आहे. यात ३३ विभागांमध्ये, सुमारे ११०आस्थापनांमध्ये ३ हजार ६०० हून अधिक संवर्ग आहेत. या संरचनेत सरळसेवा भरतीसंदर्भात १ हजार ४०० हून अधिक सेवाप्रवेश नियम आहेत. यातून विविध विभागांमधून स्वतंत्रपणे तितक्याच परीक्षा घेण्यात येत होत्या. आता त्याऐवजी परीक्षांची संख्या कमी होऊन उमेदवारांसाठी भरतीच्या पदांची संख्या वाढणार आहे. त्यासाठी अधिक एकसंध, सुलभ, पारदर्शक, परिणामकारक आणि कालबद्ध निवड प्रक्रिया राबविण्यासाठी सुधारणा करण्यात येणार आहे. या सुधारणांमुळे सेवाप्रवेश नियमांमध्ये मोठे बदल होणार आहेत. याशिवाय सेवांतर्गत पदोन्नतीसाठी स्वतंत्र संवर्ग संरचना आणि मृत संवर्गांची पुनर्रचना होणार आहे.• सेवाप्रवेश नियमांमधील व्यापक बदल- विविध संवर्गांच्या ५७४ सेवाप्रवेश नियमांमध्ये बदल. यामध्ये शैक्षणिक पात्रता, अनुभव, कौशल्ये आणि प्राधान्य निकषांचे सुसूत्रीकरण तसेच विविध संवर्गातील विसंगती दूर.• अनुभवाच्या अटींचे सुसूत्रीकरण- समान स्वरूपाच्या संवर्गांसाठी वेगवेगळ्या अनुभवाच्या अटी असल्याने परीक्षांची संख्या अनावश्यकरीत्या वाढत होती. त्यामुळे शैक्षणिक व अनुभव निकष अधिक सामायिक, सुसंगत आणि तर्कसंगत करण्यात येणार. यापुढे सर्वसाधारणपणे सरळसेवा भरतीसाठी अनुभवाची अट लागू राहणार नाही. • महाराष्ट्र नागरी सेवा, राजपत्रित गट-अ व गट-ब परीक्षा पद्धतीचा विस्तार- सध्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र नागरी सेवा, राजपत्रित गट-अ व गट-ब परीक्षा योजनेअंतर्गत सहा सेवांमधील एकूण ५७ संवर्गांमध्ये पदभरती केली जाते. सुधारणेनंतर या सेवांमध्ये ४५ संवर्गांचा नव्याने समावेश करून याअंतर्गत एकूण १०२ संवर्गांचा समावेश करण्यास मान्यता.•नवीन सेवा- संयुक्त परीक्षांचे आयोजन सुसूत्रीकरण होणार. विविध प्रशासकीय विभागांतील समान संवर्गांच्या वर्गीकरणाच्या आधारे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरती केल्या जाणाऱ्या सध्याच्या सेवांव्यतिरिक्त आणखी १८ नवीन सेवा निर्माण करण्यास मान्यता. या १८ नवीन सेवांमध्ये विविध प्रशासकीय विभागांतील एकूण ९३ संवर्गांचा समावेश.• गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गांचे प्रशासकीय आणि तांत्रिक गटात वर्गीकरण- गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गांची भरती प्रक्रिया अधिक एकसमान व कार्यक्षम करण्यासाठी त्यांचे "प्रशासकीय संवर्ग गट" आणि "तांत्रिक संवर्ग गट" असे वर्गीकरण. कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेऊन प्रशासकीय स्वरूपाचे कामकाज असलेल्या २६९ संवर्गांचे १८ गट, तर तांत्रिक स्वरूपाचे कामकाज असलेल्या २२१ संवर्गांचे ३० गट. याकरिता स्वतंत्र भरती प्रक्रिया राबवण्यात येईल.• मुलाखतीऐवजी अंतर्गत पदोन्नती व प्रतिनियुक्ती-नामनिर्देशनाच्या कोट्यातील काही राजपत्रित संवर्गातील पदे मुलाखतीने भरण्याऐवजी अंतर्गत पदोन्नती व प्रतिनियुक्तीने भरण्यात येणार.• कालबाह्य संवर्गांचे पुनर्गठन आणि निरसन- प्रशासकीय कामकाज आणि शासकीय व्यवहारात माहिती-तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर वाढला आहे. या पार्श्वभूमीवर काही संवर्गांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आता कालबाह्य ठरल्या आहेत. त्यामुळे प्रशासकीयदृष्ट्या अनावश्यक ठरलेल्या संवर्गांना कालबाह्य संवर्ग (Dying Cadre) म्हणून घोषित. या पदांऐवजी कृत्रिम बुद्धिमत्तेची जाण असलेली नवीन पदे निर्माण करण्याचा आवश्यकतेनुसार विचार होणार.• अराजपत्रित संवर्गांसाठी 'नो इंटरव्ह्यू पॉलिसी'- अराजपत्रित संवर्गांसाठी मुलाखत न घेण्याचे (No Interview Policy) धोरण लागू करण्यात येईल. यामुळे निवड प्रक्रिया अधिक सुलभ,जलद आणि पारदर्शक होईल.• निवड न झालेल्या उमेदवारांसाठी "निपुण सेतू" उपक्रम- केंद्रीय लोकसेवा आयोगाने (UPSC) मुलाखत फेरीपर्यंत पात्र ठरलेल्या परंतु अंतिम गुणवत्ता यादीत स्थान न मिळालेल्या उमेदवारांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रतिभा सेतू पोर्टल सुरू केले आहे. त्याच धर्तीवर, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून अंतिम निवडीसाठी शिफारस न झालेल्या उमेदवारांची माहिती सार्वजनिक व खासगी क्षेत्रातील संस्थांना उपलब्ध करून देण्यात येणार. त्यासाठी महाजॉब्स (MahaJobs) पोर्टलअंतर्गत "निपुण सेतू" हा उपक्रम सुरू करण्यात येणार.• डिजिलॉकरद्वारे कागदपत्र पडताळणी - DigiLocker हे भारत सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयामार्फत विकसित डीजी लॉकर हे सुरक्षित डिजिटल दस्तावेज व्यासपीठ आहे. त्याचा वापर करून पदभरती प्रक्रिया सुलभ, जलद आणि पारदर्शक करण्यात येणार. यात उमेदवारांची शैक्षणिक गुणपत्रिका, अन्य स्थानांतरण, दिव्यांग, जात, क्रीडाविषयक प्रमाणपत्रे इत्यादी कागदपत्रे डिजिलॉकरद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील. या सर्व सुधारणांमुळे पदभरतीसाठीच्या परीक्षांची संख्या मोठ्या प्रमाणावर कमी होईल. भरती प्रक्रिया अधिक कालबद्ध, पारदर्शक, सुलभ आणि कार्यक्षम बनेल. समान संवर्गांसाठी समान निकष, दस्तावेज पडताळणीतील सुलभता, निवड प्रक्रियेतील सुसूत्रीकरण, आणि तंत्रज्ञानाधारित प्रणालींचा वापर यामुळे शासनाची पदभरती व्यवस्था अधिक सक्षम होईल.

***नगर विकास विभागकुळगांव-बदलापूर मधील मंजूर विकास आराखड्यातील चार एकर जमीन वीज उपकेंद्र उभारणीसाठी देणार

कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेच्या मंजूर विकास आराखड्यातील मौजे कात्रप येथील स्टेडियमसाठी आरक्षित जमिनीपैकी चार एकर जमीन वीज उपकेंद्र उभारणीसाठी हस्तांतरित करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. अंबरनाथ, कुळगाव-बदलापूर परिसरातील वाढते शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या विचारात घेता टाटा पॉवर कंपनीस उपकेंद्र उभारण्यास उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने नवीन उपकेंद्र उभारण्यासाठी टाटा पॉवर कंपनीची शिफारस केली आहे. या ठिकाणी टाटा पॉवर कंपनी ११०/२२ के.व्ही.क्षमतेचे वीज उपकेंद्र उभारणार आहे. त्यानुसार मौजे कात्रप येथील स्टेडियमसाठी आरक्षित भूखंडापैकी चार एकर जागा टाटा पॉवर कंपनीस हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली.

*** पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागनाबार्डकडून मच्छिमारांच्या मुलभूत सोयी सुविधांकरिता ६१ कोटी २४ लाख

नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी योजनेतून सागरी जिल्ह्यातील मच्छिमारांसाठी मासळी उतरविण्याच्या मुलभूत सोयी सुविधा उभारण्यासाठी ६१ कोटी २४ लाख रुपयांच्या कामांना मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निधीतून ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, पालघर आणि रत्नागिरी येथील विविध ठिकाणी पायाभूत सुविधा उभारल्या जाणार आहेत. सागरी जिल्ह्यांमधील मच्छिमारांसाठी मासळी उतरविण्याच्या ठिकाणी मुलभूत सोयी सुविधा नसल्याचे आढळून आले आहे. त्यासाठी नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधीअंतर्गत प्राप्त होणाऱ्या कर्जाद्वारे मासेमारीसाठी बंदरे व लहान धक्के बांधण्यात येतात. या योजनेत नाबार्डचा ९५ टक्के तर राज्याचा हिस्सा ५ टक्के असा असतो. यासाठी नाबार्डकडे सादर झालेल्या प्रस्तावातील काम पूर्ण झालेल्या तसेच प्रगतीपथावरील कामांसाठी हा ६१ कोटी २४ लाख रूपयांचा निधी वापरण्यात येणार आहे. यात ठाणे जिल्ह्यातील दिवाळे गाव, रायगड जिल्ह्यातील बोर्ली मांडला, दिघी, राजपूरी, नांदगाव, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग, पालघर जिल्ह्यातील धाकटी डहाणू, रत्नागिरी जिल्ह्यातील वेलदूर यांसह पाचू बंदर, बोऱ्या आणि चिंबई यांचा समावेश आहे. या ठिकाणच्या कामांच्या अंदाजपत्रकास आज झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

***कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागमुंबईत आयईएस स्कील टेक विद्यापीठ होणार

इंडियन एज्युकेशन सोसायटी या संस्थेस मुंबईत आयईएस स्कील टेक विद्यापीठ स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. हे विद्यापीठ कायम स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर खाजगी कौशल्य विद्यापीठ म्हणून कार्यरत राहील. हे विद्यापीठ वांद्रे येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून सुरू होईल. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संदर्भात सन २०१५ मध्ये राष्ट्रीय धोरण जाहीर करण्यात आले आहे. या धोरणानुसार रोजगाराची संधी व पुरवठा यामधील विसंगती दूर करण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण गरजेचे असल्याचे म्हटले आहे. त्याचप्रमाणे स्कील इंडियाच्या धर्तीवर कुशल महाराष्ट्र रोजगारयुक्त महाराष्ट्र या धोरणानुसार राज्यात कौशल्य विद्यापीठाची स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच राज्यात कायम स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर खाजगी कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी २०२१ मध्ये विनियमन व कार्यपध्दती याबाबत मार्गदर्शक सूचना निश्चित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार या विद्यापीठाची स्थापन करण्यात येणार असून या कौशल्य विद्यापीठात कौशल्य विकासाचे विविध अभ्यासक्रम शिकविले जाणार आहेत.

***वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागवैद्यकीय शिक्षण, नर्सिंग, आरोग्य सेवा सशक्तीकरणासाठी जायकाकडून ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्यता

राज्यातील वैद्यकीय शिक्षण, नर्सिंग आणि आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी सशक्तीकरण प्रकल्प राबविण्यात येणार आहे. त्यासाठी जपानच्या इंटरनॅशनल को ऑपरेशन एजन्सीकडून (जायका) ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्यता घेण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्यातील जनतेला किफायतशीर दरात वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ निर्माण व्हावे, त्यांना दर्जेदार वैद्यकीय शिक्षण उपलब्ध व्हावे याकरिता राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात यापूर्वीच शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात आली आहेत. याशिवाय जळगांव, लातूर, बारामती, मिरज, कोल्हापूर, नंदूरबार व गोंदिया या सात जिल्ह्यांमध्ये १०० प्रवेश क्षमतेचे शासकीय बीएस्सी नर्सिंग विद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय व संलग्नित रूग्णालयांच्या पायाभूत सुविधांकरिता तसेच अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध व्हावी, याकरिता "स्ट्रेन्थनिंग टर्शरी हेल्थ केअर डिलीव्हरी, मेडिकल एज्युकेशन सिस्टीम अॅण्ड नर्सिंग सिस्टीम इन महाराष्ट्र हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी जपानच्या इंटरनॅशनल को ऑपरेशन एजन्सीकडून ३ हजार ७०८ कोटींचे वित्तीय सहाय्य उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. त्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या प्रकल्पात वर्धा, पालघर, रत्नागिरी, अहिल्यानगर या नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी तसेच मुंबईतील जीटी, सेंट जॉर्ज, धुळे, सोलापूर, अंबेजोगाई, अकोला, आयजीएमसी नागपूर, रत्नागिरी, पालघर, धाराशिव येथील नर्सिंग महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन करण्यात येणार आहे. तर बारामती, सांगली (मिरज), कोल्हापूर येथील नर्सिंग महाविद्यालयांचे बांधकाम करण्यात येणार आहे. याशिवाय अहिल्यानगर, भंडारा, गडचिरोली, हिंगोली, जालना, मुंबई, नाशिक, परभणी, सातारा, पालघर, रत्नागिरी, वर्धा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी यंत्रसामुग्री उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. तसेच भारत-जपान शैक्षणिक आदान प्रदान कार्यक्रमांतर्गत रूग्णालय व्यवस्थापन व प्रशासन मानवसंसाधन विकास यांच्या क्षमता वृध्दीसाठी तरतूद करण्यात येणार आहे.

***नियोजन विभागआकांक्षित जिल्हा, तालुका कार्यक्रमाचा विस्तार आणखी सहा जिल्हे, १५० तालुक्यांचा समावेशआकांक्षित जिल्हा व आकांक्षित तालुका कार्यक्रमाचा विस्तार करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार या कार्यक्रमात हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे व परभणी या सहा जिल्ह्यांचा समावेश करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

राज्याच्या प्रादेशिक संतुलित विकासाला चालना देण्याकरिता, आकांक्षित जिल्हा व तालुका कार्यक्रमाचा राज्य योजनेंतर्गत विस्तार करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात घोषणा केली आहे. त्यानुसार नीति आयोगाच्या आकांक्षित जिल्हा कार्यक्रमांतर्गत यापूर्वीच्या ४ जिल्ह्यांसह आता त्यामध्ये राज्य शासनाच्या विस्तार कार्यक्रमांतर्गत नव्याने ६ जिल्ह्यांची निवड करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याचबरोबर सध्याच्या २७ आकांक्षित तालुक्यांव्यतिरिक्त नवीन १५० तालुक्यांची निवड करण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे या १० जिल्ह्यातील ७७ आकांक्षित तालुक्यांसह राज्यातील अन्य जिल्ह्यातील १०० आकांक्षित अशा १७७ तालुक्यांमध्ये हा कार्यक्रम राबवण्यात येणार आहे. या आकांक्षित जिल्ह्यांची निवड आरोग्य आणि पोषण, शिक्षण, कृषि आणि सिंचन, कामगार, वने, ऊर्जा वापर, दारिद्र्य, मानवविकास निर्देशांक, ग्रामीण घनता या क्षेत्रांच्या आधारावर करण्यात आली आहे तर तालुक्यांची निवड दारिद्र्य निर्मूलन, पोषण, आरोग्य, शिक्षण, रस्ते, ऊर्जा या सहा क्षेत्रातील १९ निर्देशांच्या आधारे करण्यात आली आहे. या आकांक्षित जिल्हा व तालुक्यांमध्ये सामाजिक व पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्यात येणार आहे. त्यामध्ये स्वच्छ पिण्याचे पाणी, वीज, डिजीटल पायाभूत सुविधा, आरोग्य सुविधा व त्यांचे बळकटीकरण, शाळा, वसतिगृहे आणि उच्च शिक्षण संस्था यांच्या पायाभूत सुविधांचे बळकटीकरण यावर धोरणात्मक उपाययोजना करण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा वार्षिक योजना, केंद्र व राज्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी, सीएसआर निधीचा धोरणात्मक वापर यावर भर देण्यात येणार आहे. जेणेकरून या जिल्ह्यांचा व तालुक्यांचा कायापालट करणे शक्य होणार आहे.

***वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागमहाराष्ट्र वैद्यकीय परिषदेवर शासनाकडून नामनिर्देशन पध्दतीने नियुक्ती

राज्यातील वैद्यकीय व्यावसायिकांची नोंदणी व नियमन करणाऱ्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषद या वैधानिक संस्थेशी निगडीत अधिनियमात सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या सुधारणेनुसार परिषदेवरील सदस्यांची नियुक्ती निवडणुकीऐवजी राज्य शासनाला नामनिर्देशन पध्दतीने करता येणार आहे. महाराष्ट्र वैद्यकीय परिषद राज्यातील वैद्यकीय व्यावसायिकांचे नियमन करते. वैद्यकीय व्यावसायिकांना संस्थेकडे नोंदणी करावी लागते. ही संस्था या व्यवसायातील नैतिक आचारसंहिता व वैद्यकीय शिक्षणाशी संबंधित बाबींचे पर्यवेक्षण करणारी वैधानिक संस्था आहे. या परिषदेची स्थापना महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ अंतर्गत करण्यात आली आहे. या परिषदेच्या अधिनियमात सुधारणा करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीमध्ये डॉ.आनंद बंग, डॉ.कैलाश शर्मा, डॉ.विकास महात्मे आदी वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञांचा समावेश होता. या समितीने अन्य राज्यांमधील वैद्यकीय परिषदांच्या रचनेचा तसेच राष्ट्रीय वैद्यकीय आयोग अधिनियम, २०१९ चा अभ्यास करून अहवाल सादर केला आहे. त्यानुसार आता परिषदेवर सदस्यांची नियुक्ती निवडणुकीद्वारे न करता नामनिर्देशन पध्दतीने करता येईल, परिषदेमध्ये तज्ञ, वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील प्रतिनिधींचा संतुलित समावेश असेल, सदस्यपदाची निवड प्रक्रिया पारदर्शक व गुणवत्ता आधारित असेल अशा दुरूस्त्या अधिनियमात केल्या जाणार आहेत. तसेच परिषदेची सदस्य संख्या १८ वरून २३ इतकी होणार आहे. यामुळे परिषद अधिक कार्यक्षम, उत्तरदायी व गतिमान पध्दतीने कार्य करू शकणार आहे.